# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 19/08/2020 (बुधवार)
(दुपार)

---

### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही – तीन दारु तस्करांना केले गजाआड, देशी दारु व ती मोटारसायकलींसह 1,47,800 रुपयांचा मुददेमाल जप्त

नागपूर जिल्हयात आगामी पोळा सणाच्या पार्श्वभुमिवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या करिता जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांनी विशेष पथके नेमुन अवैध दारु विक्रेत्यांवर धाडी टाकण्याचे निर्देश दिले. यावरुन पोलीस ठाणे बुटीबोरी हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात नेमण्यात आलेल्या पथकाने विश्वसणीय सूत्रांकडून प्राप्त गोपनिय माहितीच्या आधारे तीन अवैध दारु विक्रेत्यांना सापाळा रचुन गजाआड केले आणि त्यांचेकडुन देशी दारुच्या 216 निपा किंमती 7800/– रु. व तीन मोटार सायकल किंमती 1,40,000/– रु. असा एकुण 1,47,800/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार वरिष्ठांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक पोलीस ठाणे बुटीबोरी हद्दीत गस्त करित असता मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे (1) राजु मोतीराम जासनकर, 27 वर्षे व त्याचा सहकारी सचिन सुरेश रामटेक, 24 वर्षे, दोन्ही रा. रुईखैरी (2) मनिष शिशिर फ्रान्सिस, 35 वर्षे, रा. बोरखेडी, (3) अंकुश विठ्ठल काकडे, 26 वर्षे, रा. बोरखेडी या इसमाची आपले मोटर सायकलने रहदारी करतांना पडताळणी केली असता त्यांचेकडुन अनुक्रमे देशी दारुच्या 48 निपा व एक मोटार सायकल, देशी दारुच्या 72 निपा व एक मोटार सायकल आणि क्र. 3 याचेकडुन देशी दारुच्या 96 निपा व एक मोटरसायकल असा एकुण 1,47,800/– रु. चा मुद्देमाल अवैधरित्या विनापरवाना मिळून आल्याने जप्त करण्यात आला असुन नमुद तीन्ही इसमांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे बुटीबोरी येथे दारुबंदी सदराखाली गुन्हे नोंदविण्यात आले.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रामा आडे, सुरेश गाते यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर